आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२० सप्टेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- कारागिर बनण्याऐवजी उद्योजक होण्यावर लक्ष देण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं वर्ध्यातून आवाहन

- मार्च २०२६ पर्यंत देशाला नक्षलवाद मुक्त करण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- दहशदवादी संघटनांना केलं जाणारं अर्थसाहाय्य आणि भ्रष्टाचार रोखण्यात भारताने केलेल्या उपाययोजनांची जागतिक आर्थिक कृती गटाकडून प्रशंसा

- जालन्यात ट्रक आणि बसची धडक होऊन झालेल्या अपघातात ६ जण ठार

**आणि**

- भारत विरुद्ध बांगलादेश कसोटी क्रिकेट मालिकेत भारताचा पहिला डाव ३७६ धावांवर आटोपला

**<><><><><>**

सन्मान, सामर्थ्य आणि समृद्धी हे प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचं ध्येय असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. या योजनेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त वर्ध्यात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आधीच्या सरकारांनी कौशल्य आणि कारागिरांना प्राधान्य दिले नाही. त्यामुळं विकासाच्या

मार्गावरुन देश पिछाडीवर गेल्याचं ते म्हणाले. या योजनेचा सर्वाधिक लाभ अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांना होतो आहे. या समाजातल्या लोकांनी केवळ कारागिर बनून न थांबता उद्योजक बनण्यावर लक्ष केंद्रीत करावं असं आवाहन त्यांनी केलं.

यावेळी त्यांनी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचं उद्घाटन केलं. तसंच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेची सुरुवात केली. अमरावतीमधल्या पीएम मित्र टेक्सटाइल पार्कचं भूमिपूजनही प्रधानमंत्र्यांनी आज केलं.

प्रधानमंत्र्यांच्या आशीर्वादाने महाराष्ट्राचा विकास बुलेट ट्रेनच्या वेगाने होईल, हा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रधानमंत्र्यांनी सुरू केलेलं परिवर्तन आम्ही राज्यात सुरू केलं. राज्यातल्या २ लाख लोकांना विश्वकर्मा योजनेची मदत झाल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. या कार्यक्रमातून साडेसहा लाख कुटुंबांचं चित्र बदलणार आहे, त्यांच्यापर्यंत रोजगार पोहोचणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

अमरावतीच्या मित्रा टेक्सटाइल पार्कमुळे इथल्या पांढऱ्या सोन्याला खरी किंमत मिळेल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून तीन दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर जात आहेत. तिथल्या डेलावेअर इथं होणाऱ्या क्वाड देशांच्या परिषदेत ते सहभागी होणार आहेत. या दौऱ्यात प्रधानमंत्री विविध परदेशी अधिकाऱ्यांशी तसंच अमेरिकेतील भारतीय जनसमुदायाशी संवाद साधणार आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रीय कृषिसंस्थेने सुरू केलेल्या योजना शेतकरी आणि उद्योजकांचं जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांच्या सर्वसमावेशक विकासासाठी साहाय्यभूत ठरतील, असा विश्वास आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला. त्यांनी रांची मधल्या नामकुम इथल्या भारतीय कृषि संशोधन परिषदेअंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय कृषि संस्थेच्या शताब्दी सोहळ्याचं उद्घाटन केलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी राज्यपाल संतोष कुमार गंगवार, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन उपस्थित होते. या कार्यक्रमात त्यांनी कृषि संशोधन आणि नवोन्मेष याबाबत संस्थेच्या आजी-माजी वैज्ञानिकांशी संवाद साधला.

**<><><><><>**

मार्च २०२६ पर्यंत देशाला नक्षलवाद मुक्त करण्याचं सरकारच उद्दिष्ट्य असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज म्हणाले. नक्षलग्रस्त भागातल्या ५५ व्यक्तींची त्यांनी दिल्लीत भेट घेतली. तेव्हा ते बोलत होते. बस्तर मधले ४ जिल्हे वगळता देशातून नक्षली नष्ट झाल्याच ते म्हणाले. इतरांनीही शस्त्र टाकून, हिंसाचार सोडून शरण यावं असं आवाहन त्यांनी केलं. सरकारच्या आवाहनाला प्रतिसाद न देणाऱ्यांच्या विरोधात मोठी कारवाई करण्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला.

**<><><><><>**

जागतिक आर्थिक कृती गटाने भारतातल्या जम्मू काश्मीरमध्ये आयसिस आणि अल कायदाशी संबंधित दहशतवादी संघटना कार्यरत असल्याचा इशारा दिला असून, दहशदवादी संघटनांना केलं जाणारं अर्थसाहाय्य आणि भ्रष्टाचार रोखण्यात भारताने केलेल्या उपाययोजनांची प्रशंसा देखील केली आहे. यासंदर्भात एफ ए टी ए ने गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये केलेल्या भारताच्या दौऱ्यानंतर याबद्दलचा अहवाल काल

प्रसिद्ध करण्यात आला आहे. भारत १९४७ पासून दहशदवादाशी सामना करत असून जम्मू काश्मीरमध्ये अजूनही दहशदवादाचा धोका कायम असल्याच त्यात म्हटलं आहे. मात्र तो रोखण्यासाठी आणि युवकांना दहशदवादाच्या मार्गापासून परावृत्त करण्यासाठी भारताने सुरू केलेल्या, सही रास्ता यासारख्या योजनांची यामध्ये प्रशंसा करण्यात आली आहे.

**<><><><><>**

बिहार आणि उत्तर प्रदेशात पूरपरिस्थिती कायम असल्यानं सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी गंगा नदी परिसरातल्या  पूरग्रस्त भागाची हवाई पाहणी करून या भागात तातडीनं बचाव आणि मदतकार्य सुरु करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. गंगा आणि इतर नद्यांना आलेल्या पूरामुळे पाटणा, बक्सर, वैशाली, बेगुसराय, नालंदा हे जिल्हे जलमय झाले आहेत.

उत्तर प्रदेशात २६ जिल्ह्यांना पूराचा तडाखा बसला असून त्यामुळे सुमारे ५ लाख लोक प्रभावित झाले आहेत. बलिया जिल्ह्यात शरयु नदीच्या पुरात राष्ट्रीय महामार्ग ३१ चा सुमारे २० मीटर भाग वाहून गेल्यानं मांझी पुलावरून होणारी वाहतूक खंडित झाली आहे.

**<><><><><>**

जालना वडीगोद्री मार्गावर शहापूर गावाजवळ आज सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास बस आणि आयशर ट्रकची धडक होऊन झालेल्या अपघातात बसच्या वाहकासह ६ जण ठार तर १० जण जखमी झाले आहेत. जखमी पैकी तीन जणांची प्रकृती गंभीर आहे. बीड जिल्ह्यातल्या गेवराई इथून जालन्याकडे जाणारी बस आणि जालन्याहून बीडकडे मोसंबी घेऊन जाणाऱ्या ट्रकची समोरासमोर धडक झाल्याने

हा अपघात झाला. बसमध्ये एकूण २४ प्रवासी होते. अपघातातल्या किरकोळ जखमींना अंबड इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी हलवण्यात आलं आहे.

<><><><><>

लष्कराला दंडाधिकाऱ्यांचे अधिकार देण्याच्या मोहंमद युनूस यांच्या निर्णयावर बांगलादेशी नॅशनलिस्ट पार्टीनं चिंता व्यक्त केली आहे. यामुळे नव्या समस्या निर्माण होतील असं पक्षाचे सरचिटणीस मिर्झा फक्रुल इस्लाम आलमगीर यांनी म्हटल आहे. या निर्णयाचा फेर विचार करण्याचं आवाहन त्यांनी हंगामी सरकारला केलं आहे. प्रशासनाला कायदा आणि सुव्यस्था राखण्यात अपयश आल्याचं यामुळे दिसून येत असल्याचा दावा आलमगीर यांनी केला आहे.

<><><><><>

इस्रायल आणि हिजबुल्लामधल्या संघर्षाने आता गंभीर वळण घेतलं आहे. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर जोरदार हल्ले चढवले आहेत आणि त्यात वाढ करण्याचा इशारा दिला आहे. यातून त्या भागात युद्धाचे ढग दाटू लागल्याची चिंता व्यक्त होत आहे. इस्रायलने लेबननवर मोठ्या प्रमाणात रॉकेट हल्ले केले. या हल्ल्यांनंतर इस्रायली लष्कराने उत्तरेकडील नागरिकांना बाहेर न पडण्याचे तसंच शक्यतो निवाऱ्यांच्या जवळपास रहाण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान गेल्या दोन दिवसांत पेजर आणि वॉकीटॉकी स्फोटात दगावलेल्यांची संख्या ३७ आणि जखमींची संख्या २ हजार ९३१ वर पोचल्याची माहिती लेबनन आरोग्य मंत्र्यांनी दिली आहे. या स्फोटाची जबाबदारी इस्रायली लष्कराने नाकारली आहे.

<><><><><>

नवीन फौजदारी कायदे समजून घेऊन गुन्हेगारांना शिक्षा करण्याऐवजी गुन्हे रोखण्यावर भर देण्याचं आवाहन केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी आज केलं. भारतीय पोलीस सेवेतल्या अधिकाऱ्यांच्या पासिंग आऊट परेडमध्ये ते हैदराबादमधल्या सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमीत बोलत होते. तांत्रिक कौशल्य विकसित करुन सायबर गुन्हेगारीचा सामना करण्याचं आवाहन त्यांनी केलं. एकूण २०७ अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण आज पूर्ण झालं. त्यात देशातले १८८ आणि भूतान, नेपाळ आणि इतर देशातले १९ अधिकारी यात होते. यामध्ये ५८ महिला अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल २१ व्या आसियान - भारत अर्थ मंत्र्यांची बैठक आणि १२व्या पूर्व आशिया शिखर परिषदेच्या अर्थमंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होण्यासाठी २ दिवसांच्या लाओस दौऱ्यावर जाणार आहेत. वाणिज्यमंत्री या दौऱ्यात,या  बैठकांशिवाय भागीदार देशांच्या समकक्ष मंत्र्यांबरोबर अनेक द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. तसंच, ते लाओस, कोरिया, मलेशिया, स्विझर्लंड आणि म्यान्मार या देशांच्या मंत्र्यांची भेट घेणार आहेत. गोयल आसियानचे महासचिव तसंच आशिया प्रशांत क्षेत्रातली प्रमुख संशोधन संस्था ‘एरिया’ च्या अध्यक्षांचीही भेट घेणार आहेत. यासोबतच ते लाओसमधल्या भारतीय समुदायाची भेट घेणार आहेत.

**<><><><><>**

शांगझोऊ इथे सुरू असलेल्या चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतलं मालविका बनसोडचं आव्हान संपुष्टात आले आहे. दोन वेळा विश्वविजेती ठरलेल्या जपानच्या आकाने यामागुची हिने मालविकाला उप उपांत्यपूर्व फेरीत दोन सलग गेममध्ये

हरवत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. महिला एकेरीत ४३ व्या क्रमांकावर असलेली मालविका बनसोड ही सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेत पी व्ही सिंधू आणि सायना नेहवाल यांच्यानंतर उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचणारी तिसरी भारतीय महिला ठरली होती.

**<><><><><>**

चेन्नईत एम एम चिदंबरम मैदानावर सुरु असलेल्या भारत आणि बांगलादेश यांच्यामधल्या सामन्यात भारताच्या पहिल्या डावात ३७६ धावा झाल्या. सामन्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी भारताने कालच्या ३३९ धावांवर डाव सुरु केला आणि ३७ धावात भारताचे उरलेले चार फलंदाज बाद झाले. आर. अश्विन यांनं ११३ धावा केल्या.

बांगलादेशच्या पहिल्या डावाची सुरुवातही खराब झाली. अवघ्या ४० धावात त्यांचे ५ गडी तंबूत परतले होते. अश्विननं त्यांचे २ बळी टिपले. शेवटच वृत्त हाती आलं तेव्हा बांगलादेशच्या ५ गडी बाद ९० धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**